# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.६/२०२४** **दिनांक १३/०६/२०२४**

**स्थळ- साई निवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **गुरुवार दि.१३.०६.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह** येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/८६२/२०२४, दि.११.०६.२०२४ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **गुरुवार दि.१३.०६.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह** येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.२८.०४.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२९१ दि.२८.०४.२०२४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचुन कायम करणे.**

**१. श्री साईबाबा महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता सहा.प्राध्यापक मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---------------------------------------------------------------------------------------------------------------

**२. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Syringe Pump खरेदीकामी निम्नतम दरधारक M/s Rajdeep Meditech, Pune यांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------------------

**३. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमध्ये राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील उर्वरीत Tablet, Injection, Syrup, Ointment, Drop करीता दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी कोटेशनमधील प्राप्त निम्नतम दराने पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------------------

**४. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वार्षिक सन २०२३-२४ मधील फेर ई-निविदेतील स्टेशनरी मटेरीयल खरेदीकामी पात्र ऑनलाईन कमर्शियल ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकास पुरवठा आदेश देणेस तसेच उर्वरीत स्टेशनरी खरेदीकामी तातडीने कोटेशन मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------------------

**५. मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.१५/२०२० मधील होणा-या निर्णयास अधीन राहून सध्याचे सिक्युरीटी कंत्राटदार यांना दि.०१.०७.२०२४ ते दि.३१.१२.२०२४ अखेर पर्यंत सध्याचे आहे त्याच दरात मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**
**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.३ व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील तळमजल्याचे पार्कींगमधील प्रसादभोजन व्यवस्थेसाठी ॲल्युमिनियम पार्टीशन करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९३ पार्टीशनचे प्रस्तावामध्ये व्हेंटीलेशनचा समावेश करुन प्रस्ताव मंजुर.**
**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४ व्दारावती भक्तनिवास इमारतीचे बुकींग काऊंटर समोरील वेटींग हॉलचे छतास बसविण्यात आलेले जुने खराब झालेले पॉलीकार्बोनेट शिट काढुन त्याऐवजी नवीन शिट बसविणेकामी येणा-या रु.१७,०६,२०६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९४ प्रस्ताव मंजुर.**
**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५ व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील पॅसेज व खोल्यांचे आतील भागातील खराब झालेले रंगकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९५ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६ शिर्डी येथील संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था इमारतीचे पत्रे बदलणे, प्रसाधनगृह नुतनीकरण करणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगीक कामे करणे कामाचे ठेकेदार गाडे यशवंत दिनकर, नाशिक यांचे कामास दि.३१.०३.२०२४ अखेर मुदतवाढ मिळणेकामी विनंतीबाबत.**

**निर्णय क्र.२९६ प्रस्ताव मंजुर.**
**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७** **संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नवीन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यामधुन पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता येणारे रक्कम रु.२,३८,०९,९५४/- मात्रचे खर्चास तसेच याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तसेच मा.विधी व न्याय, विभाग महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेऊन विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९७ तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८** **श्री साईबाबा संस्थान मार्फत नव्याने लेजर शो (Light & Sound Show) प्रकल्प BOT (Build– Operate-Transfer) तत्वावर उभारणेसाठी सल्लागार Rhino Engineers Pvt.Ltd., Ahmadabad व श्री.नितीन कुलकर्णी यांचे सादरीकरण पाहून सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९८ तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.९** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारतीचे दक्षिणेकडील बाजुस गर्दीचे काळात साईभक्तांची निवासव्यवस्था करणेकामी तसेच इतर वेळी वाहनांचे पार्कींगसाठी कायमस्वरुपी टेक्साईल फॅब्रीकचे शेड उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.२९९ स्थळ निरीक्षण करणे आवश्यक आहे. तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१०** **श्री गुरुपोर्णिमा उत्सव २०२४ निमित्त तसेच पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.११** **शिर्डी मंजुर विकास योजनेतील शिर्डी-निमगाव शिव रस्ता १५ मी.रुंदीकरण रस्ता (नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिमेकडील श्री साईबाबा संस्थान साई प्रसादालयाकडे जाणारा) भूसंपादनासाठी शिर्डी नगरपरिषदेचे रु.१.६६ कोटी निधी मागणी प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र.३०१ अभ्यास करणे आवश्यक आहे. तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१२** **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ मध्ये उभारलेल्या शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता वाढीव ६२ नग डिजीटल स्मार्ट बोर्ड खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०२ तहकुब.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१३** **श्री साईबाबा मंदिर नवीन दर्शनरांग इमारतीचे समोर साईभक्तांचे सुविधेकरीता व त्यांचे ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण होणेसाठी टेन्साईल फेब्रीक छत असलेले शेड उभारणेकामी निम्नतम निविदाधारक मे.सुभाष कन्स्ट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांची रु.२,६४,४८,७२०/- मात्रची निम्नतम दराची ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेसाठी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.३०३** **शिक्षक पदवीधर मतदारसंघ निवडणूक आचारसहिंता असल्याने निवडणूक आयोगाच्या परवानगीस अधिन राहून प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१४** **नवीन श्री साईबाबा दर्शनरांग इमारतीमध्ये साईभक्तांचे सुविधेकरीता अतिरिक्त व्यवस्था निर्माण करणेसाठी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम निविदाधारक मातोश्री इंटेरीअर्स, केडगाव, अहमदनगर यांची रु.२४,०५,२३६/- मात्रची निम्नतम दराची ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेसाठी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.३०४** **शिक्षक पदवीधर मतदारसंघ निवडणूक आचारसहिंता असल्याने निवडणूक आयोगाच्या परवानगीस अधिन राहून प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१५** **श्री साईनाथ रुग्णालय परिसरात नव्याने लॉण्ड्री युनिट उभारणे करणेकरीता आर्किटेक्ट राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहून याकामी येणा-या अंदाजे रु.५.०७ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०५** **आर्किटेक्ट श्री.राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहीले. समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१६** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नव्याने प्रशासकीय कार्यालय इमारत उभारणी करणे कामाविषयी आर्किटेक्ट राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहून याकामी येणा-या रक्कम रु.७.९५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०६** **आर्किटेक्ट श्री.राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहीले. संस्थानचे सर्व प्रशासकीय कार्यालये एका छताखाली आणण्याचे दृष्टीने विचार करुन त्यानुसार सुधारीत प्रस्ताव सादर करावा.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१७** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नव्याने केस पेपर इमारत उभारणेकामी आर्किटेक्ट राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहून याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४.५६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०७** **आर्किटेक्ट श्री.राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहीले. समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१८** **मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील अंदाजे रु.११.४० कोटी खर्चाचे प्रस्तावीत भांडार इमारत बांधकाम प्रकल्पाचे सादरीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.३०८** **आर्किटेक्ट श्री.राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहीले. समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१९** **संस्थानचे व्दारावती भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) या इमारतींचे सांडपाणी शुध्दीकरण करुन पुनर्वापर करणेसाठी अनुक्रमे 200 KLD व 300 KLD क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP) भाभा परमाणू संशोधन केंद्र (BARC) यांनी विकसीत केलेल्या Hybrid Granular SBR Treatment (GST) या तंत्रज्ञानानुसार उभारणीकरीता येणारे एकुण रु.१८७.६२ लक्ष मात्रचे प्राथमिक ढोबळ अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेबाबत तसेच सदर प्रकल्पाचे उभारणीकरीता Design Build Operate Transfer (DBOT) तत्वावर ई-निविदा मागविणेकरीता मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०९** **श्री. अरुणकुमार तिवारी यांनी केलेले सादरीकरण पाहीले. प्रस्ताव मंजुर.सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२०** **विद्युत विभागामार्फत प्रस्तावीत असलेल्या श्री साईनाथ हॉस्पिटल तसेच व्दारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोडकरीता मंजुर झालेल्या ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबिकल, इलेक्ट्रीकल पॅनेल व केबल कामाकरीता, साईपालखी निवारा येथील प्रस्तावीत सबस्टेशन व जनरेटर सेट बसविणेचे कामाकरीता, श्री साई प्रसादालय येथे वाढीव क्षमतेचे जनरेटर सेट बसविणे कामाकरीता, श्री साईबाबा संस्थानकरीता महाराष्ट्र प्रदुषण बोर्ड यांचे जनसेटबाबतचे प्राप्त पत्रानुसार कार्यवाही करुन विविध क्षमतेचे जनसेट खरेदी करणे अथवा त्यात अनुषंगिक बदल करणे तसेच भविष्यात पुढील पाच वर्षाकरीता विद्युत विभागाचे तंत्रज्ञानामध्ये तसेच उपकरणांमध्ये होणारे बदल विचारात घेता तज्ञ सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१०** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२१** **नवीन शैक्षणिक संकुल प्रकल्पातील ज्युनियर, सिनियर कॉलेज, इंग्लिश मिडीयम स्कुल तसेच कन्या विद्यालयामधील प्राचार्य केबीन, टिचर रुम, कॉम्प्युटर लॅब व सायन्स लॅबमधील पॉवर पॉईंट काढून त्याकरीता वायरिंग करणेस त्याचप्रमाणे एक्झॉस्ट फॅन बसविणे कामाकरीता येणा-या अतिरिक्त खर्चाबाबत ठेकेदार व आर्किटेक्ट यांचे समवेत चर्चा होऊन प्रस्तावास व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३११** **प्रस्ताव ‘अ’ मंजुर. ‘ब’ नामंजूर.** **(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा संस्थानमधील फायर अँड सेफ्टी विभागातील कर्मचारी यांना तृतीय टप्प्यांतील (महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचेमार्फत) प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३१२ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-फायर अॅन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्री साईनाथ रुग्णालयातील लॉन्ड्री विभागाकरीता वॉशिंग मशिन व कॅलेंडर मशिन खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१३** **शिक्षक पदवीधर मतदारसंघ निवडणूक आचारसहिंता असल्याने निवडूणक आयोगाच्या परवानगीस अधिन राहून प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२४** **नवीन दर्शन रांग इमारतीतील १० लिफ्टचे एक वर्ष कालावधी करीता कॉम्प्रेहेनसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१४** **शिक्षक पदवीधर मतदारसंघ निवडणूक आचारसहिंता असल्याने निवडूणक आयोगाच्या परवानगीस अधिन राहून प्रस्ताव मंजूर. नवीन दर्शनलाईन मधील लिफ्टचा वापर प्राधान्यांने साईभक्तांसाठी सुरु करण्यात यावा.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२५** **श्री साई प्रसादालयातील जुन्या नादुरुस्त पाच चपाती मशिन्सची जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१५ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२६** **श्री साई प्रसादालयाकडील जुने डिश वॉशिंग मशिन्स (दोन नग) जाहीर लिलावाने विक्री करणेस मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.३१६** **निकामी असलेले डिश वॉशिंग मशिन (एक नग) ची किंमत रु.५० हजाराचे आत असल्यास नियम १७/४ प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. दुसरे मशिन वापरात आणण्यात यावे.** **(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२७ जुना पिंपळवाडी रोडवरील पॉलीकोर्बोनेट शिट शेड काढून साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंगच्या जागेमध्ये पुर्न:उभारणी करणेस तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१७ तहकुब.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२८ श्री साईनाथ रुग्णालय परिसरात पुढील ५ वर्षासाठी भाडेतत्वावर औषध दुकान चालविणेस देणेबाबत.**

**निर्णय क्र.३१८ निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. बेस प्राईस (दरमहा भाडे) व डिस्काऊंट दर्शविणारा ई-निविदा प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२९ महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांवर संपुर्ण उपचार झाल्यानंतर विमा कंपनीने नामंजूर केलेल्या बिलांच्या रकमेस वैद्यकीय सवलत देऊन बिले सेटल करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३० श्री साईबाबा हॉस्पीटलमधील जिवनदायी आरोग्य योजनेचे विशेष लेखापरिक्षण अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.३२० तहकुब. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अभ्यासपुर्वक फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३१ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन २०२४-२५ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२१ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३२** **दोन्ही हॉस्पिटलकरीता संगणके, लॅपटॉप, युपीएस व प्रिंटर्स खरेदी करणेकामी नव्याने ई-निविदा प्रकिया राबविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२२ प्रस्ताव मंजुर. आचारसंहिता संपल्यानंतर कार्यवाही करावी.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३३** **संस्थान कायम कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबीतावरील वैद्यकीय खर्चाची परिपुर्तीची रक्कम रु.४०,०००/- ऐवजी रु.१,००,०००/- पर्यंतची मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अधिकारात मंजुर करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३४** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.३,८४,२२७/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३५** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.४,१४,९६४/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वैद्यकीय संचालक व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिक्षक ही रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात जाहिरातीव्दारे भरणेबाबत.**

**निर्णय क्र.३२६ तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३७** **श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांना ३ व ६ पगारवाढ लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२७ प्रस्ताव मंजुर. मागणी अमान्य.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३८** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी-२०२४ ते मार्च-२०२४ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.२,८१,९६,५४५/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२८ नोंद घेतली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३९** **सशस्त्र सेना ध्वजदिन-२०२३ निधी संकलनाबाबत आर्थिक अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.३२९ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.४०** **माहे डिसेंबर-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३३० नोंद घेतली.** **(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४१** **माहे जानेवारी व फेब्रुवारी-२०२४ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३३१ नोंद घेतली.** **(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४२** **दि.०१.०१.२०२४ ते दि.३१.०३.२०२४ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणीकरिता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३३२ तहकुब.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४३** **आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये केलेल्या गुंतवणकीचा अहवालास व आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये कमाल व्याजदर देणा-या राष्ट्रीयकृत बॅंकामध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३३३ नोंद घेतली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४४** **संस्थानला प्राप्त झालेल्या रु.२,६२,९५,०११/- सेवाकर भरणा आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करुन कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३३४ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४५** **मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आयकर विभागाने दाखल केलेल्या अपील विरोधात कार्यवाही करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३५ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४६** **संस्थान व रुग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा, कामगार कायदा १९२३ अन्वये कर्मचारी विमा व श्री साईभक्तांचा अपघाती विमा इ. पॉलीसीचे नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून बंद पाकीटामध्ये दरपत्रक मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३३६ शासकीय विमा धोरणाची माहिती घ्यावी. ते विमा निधी स्विकारण्यास तयार असतील तर त्यांचेकडून दर प्राप्त करुन घेण्यात यावेत व त्या दरासह सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा.**

**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.४७** **श्री साई मंदिर, पेठ वडगाव, कोल्हापूर व दावानगेरे, कर्नाटक येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३७ तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४८** **श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०२४ साजरा करणेस व याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३३८** **प्रस्ताव मंजुर. ज्या भक्तमंडळाचे ई-मेल आयडी व मोबाईल नंबर उपलब्ध आहेत त्यांना मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार त्यांचे ई-मेलव्दारे व मोबाईल वर निमंत्रण पाठविण्यात यावे.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४९** **साईबाबा पालखी सोहळा शिर्डी यांना श्री क्षेत्र पंढरपुर पायी दिंडी सोहळयासाठी संस्थानतर्फे सहकार्य मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३३९** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५०** **संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित वेतन/मानधनावर ११ महिने कालावधीसाठी अधिकारी/कर्मचारी नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४० तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५१** **वाहन कर मुदतीत भरण्यामध्ये उशीर झाल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत लेखाशाखा विभागाने चौकशी करुन सादर केलेल्या अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.३४१** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कार्यकाळातील पूर्वलक्षी प्रभावाने वाहतुक भत्ता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४२** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५३ संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी व ठेकेदारामार्फत असलेले कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा सन २०२३-२४ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा देणेबाबत.**

**निर्णय क्र.३४३ प्रस्ताव मंजुर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.५४ श्री साईबाबा महाविद्यालय प्राचार्य पद भरणेबाबत.**

**निर्णय क्र.३४४ तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५५ शासनाने संस्थानात अनुकंपा भरती मर्यादा १० टक्के ऐवजी २० टक्के करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार दि.०१/०१/०२०२२ ते दि.३१/१२/२०२३ या कालावधीतील उर्वरीत १० टक्के पदांवर अनुकंपा प्रतिक्षायादीवरील पात्र कुटुंबीयांना गट क व गट ड चे पदांवर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३४५ तहकुब. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५६ संस्थानचे हैद्राबाद, बेंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मुदतवाढ व वेतनवाढीबाबत.**

**निर्णय क्र.३४६ प्रस्ताव मंजुर. ऑनलाईन सुविधा उपलब्ध असतांना अशा कर्मचा-यांची आवश्यकता आहे काय याबाबत आढावा घेण्यात यावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५७ शासन निर्णय व परिपत्रके यांचे वाचन.**

**निर्णय क्र.३४७ नोंद घेतली.**

**(कार्यवाही-मागासवर्ग कक्ष)**

---

**विषय नं.५८ संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांचा विमा उतरविणेबाबत.**

**निर्णय क्र.३४८ तहकुब.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.५९ श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांचे विनंतीनुसार वैयक्तिक साईसेवक योजना सुरु करणे व पुर्वीच्या साई सेवक योजना नियमावलीमध्ये अंशत: बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४९ तहकुब.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.६० साईभक्त कै.दगडू (भाऊ) गायके या नावामध्ये त्यांच्या वडीलांचे नाव समाविष्ट करणेबाबत साईभक्त कै.दगडू (भाऊ) बापु गायके यांचे वशंज (श्री. बाबुराव गंगाधर गायके व इतर,रा.शिर्डी) यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३५० तहकुब.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.६१ सन २०२४-२५ करीता (माहे जुलै,२०२४ ते जून २०२५ अखेर) बुंदी प्रसाद तयार करून उत्पादन तारखेचे शिक्के मारून पॅकींग करून घेणेकामी उक्त्या मजुरीची अंदाजे रक्कम रुपये १.१६ कोटी मात्रचे खर्चाची ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५१ पुढील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देई पावेतो पुर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग)**

---

**विषय नं.६२ सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात लाडू व बुंदी प्रसाद बनविणेसाठी खर्च झालेल्या हरभरा दाळ व हिरवी विलायची या किराणा मालाच्या घट-तुटीची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३५२ नोंद घेतली.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग)**

---

**विषय नं.६३ साई प्रसाद निवासस्थान या विभागासाठी प्रिटेंड बेडशीट उशीकव्हरसह खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५३ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.६४ मंदिर परिसरातील गुरुस्थान निंबवृक्षाची विद्यापीठ शास्त्रज्ञांकडून पाहणी अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.३५४ तहकुब.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.६५ सन २०२३-२४ मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा, कॉफी, दुध व बिस्कीटे वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३५५ नोंद घेतली.**

**(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)**

---

**विषय नं.६६ संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.११६/५ क्षेत्र ३.५० आर व त्यामधील इमारत क्षेत्र २६६.७४ चौ.मी. आर.सी.सी.बांधकाम शिर्डी नगरपरिषद हद्दीमधील जिल्हा परिषद मोठेबाबा शाळेकरीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.३५६ तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.६७ संस्थानचे पिंपळवाडी रोड लगतचे जनरेटर रुम शेजारील मोकळया जागेत मोबाईल कॅमेरा क्लोकरूम सुरू करण्यास परवानगी मिळणेबाबत चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/२१७/२०२४ दि.०९.०१.२०२४.**

**निर्णय क्र.३५७ तहकुब.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.६८ नवीन दर्शनरांग इमारतीमध्ये साईभक्तांचे सोईसाठी व सेवेसाठी तळमजल्यावरील गाळा मिळणेबाबत चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/२१८/२०२४ दि.०९.०१.२०२४.**

**निर्णय क्र.३५८ तहकुब. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.६९ नवीन दर्शनरांग इमारतीत पाणी व थंडपेय विक्री स्टोअर चालविण्यास परवानगी मिळणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/ २१९/२०२४ दि.०९.०१.२०२४ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.३५९ तहकुब. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७० संस्थानचे मंदिर परिसरातील गेट नं.४ येथील जागा मोबाईल कॅमेरा क्लोकरुमसाठी वापरास मुदतवाढ मिळणेबाबत चेअरमन, श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/२७४/२०२४ दि.०७.०३.२०२४ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.३६० प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७१ श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी बस स्टॅन्ड समोरील स्वागतकक्षाचे जागेत चालवत असलेले मोफत बॅग क्लोकरुम सुविधा पुढील ११ महिन्यासाठी चालविण्यास परवानगी मिळणेबाबत सोसायटी यांचे दि.७.३.२०२४ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.३६१ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७२ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील शिर्डी नगरपरिषद हद्दीतील सिटी सर्व्हे नं.१२५ मधील साईबाबा हॉस्पिटलचे परिसरात सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना एटीएम साठी भाडेतत्वावर वापरावयास दिलेल्या बांधीव जागेच्या मुदतवाढीबाबत शाखाधिकारी, सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी शाखा यांचेकडील दि.२८.०२.२०२४ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.३६२ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७३ मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीचे सर्व्हे नं.५४,५५ मध्ये साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरत्या स्वरुपात वाहनतळाची व्यवस्था सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६३ तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७४ मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीच्या सेवाधाम इमारतीत रेल्वे विभागाचे तिकीट आरक्षण काऊंटरसाठी वापरास दिलेल्या दोन रुमच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६४ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७५ श्रीमती शामला जयप्रकाश माकामा व इतर यांनी त्यांचे मालकीचे मौजे शिर्डी ता. राहाता येथील सर्वे नं.११६/५ पै.मधील क्षेत्र ३.५० आर व त्यामधील इमारत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दानपत्र करून दिलेबाबत.**

**निर्णय क्र.३६५ नोंद घेतली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७६ शिर्डी शहरातील बिरेगाव शिव विकास योजना १८.० मी.रुंद (स.नं.२०६ व २०७) रस्त्याचे कामाबाबत एफएसआय/टीडीआर प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६६ तहकुब. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७७ संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थानच्या पार्किंगमध्ये फळे विक्रेत्यांना फळे विक्री करणेकामी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून व करारनामा नोंदवुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३६७ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७८** **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस ३३/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी वापरास दिलेल्या संस्थानचे मालकीची मौजे निमगाव-को-हाळे येथील जमीन गट नं.८७ पै.क्षेत्र २४.५ आर व गट नं.८८ पै.क्षेत्र २७.५ आर असे एकुण ०.५२ आर इतके जागेस मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६८** **प्रस्ताव मंजुर. शासनाचे धोरणानुसार दिर्घ मुदतीसाठी जागा वापरास देणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत यावा.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७९** **व्दारावती भक्तनिवास विभागाकडील जुन्या फायबर फोम टु फोल्ड मॅट्रेस जाहीर लिलावाने विक्री करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६९ तहकुब.** **(कार्यवाही-व्दारावती भक्तनिवास)**

---

**विषय नं.८०** **सोलापुर चादर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७० तहकुब.**

**(कार्यवाही-साईबाबा भक्तनिवास)**

---

**विषय नं.८१** **साठा संपुष्टात येत असलेल्या संस्थान प्रकाशीत प्रकाशनांचे पुर्नमुद्रण करणेसाठी अंदाजे रक्कम रु.४,२०,००,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७१ तहकुब.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.८२** **आर्थिक वर्ष सन २०२३-२०२४ (दि.०१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२४) देणगीदार व मान्यवरांना भेट देण्यात आलेली संस्थान प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.**

**निर्णय क्र.३७२ नोंद घेतली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.८३** **श्री साईबाबा संस्थानमार्फत साईभक्तांकरीता उपलब्ध सोयी-सुविधाबाबत Documentary तयार करुन संस्थानचे अधिकृत वेबसाईट व सोशल मिडीया अकाऊंटवर प्रसारीत करणेकामी या क्षेत्रातील संस्थेची नेमणुक करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७३ तहकुब.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.८४** **“SHRI SAIBABA SANSTHAN TRUST” नामक संस्थेमार्फत https://shirdisaitrust या बनावट वेबसाईटद्वारे साईभक्तांची फसवणूक/दिशाभुल होत असल्याने सबंधीतांविरुद्ध कायदेशीर कारवाई करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७४ तहकुब.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.८५** **श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (निमगाव को-हाळे) येथील इमारती व ऑडीटोरीयम या ठिकाणी शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाकरीता आवश्यक संगणकीय नेटवर्कची उभारणी करणेकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७५ तहकुब.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.८६** **संस्थानचे नवीन शैक्षणिक संकुल इमारतीमध्ये अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी लागणारे तद्अनुषंगीक तांत्रीक साहित्य (Internal Cables, MDF Box, Cable Infra from Installed Gateway Rack to Each Building, Telephone Outlet Socket, Rawal Plug, Screw, Casing Capping Patti etc.,) खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७६ तहकुब.**

**(कार्यवाही-ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

**विषय नं.८७** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार संस्थानचे दुरध्वनी यंत्रणेकरीता Manual for Procurement for Consultancy and other Services-2017 नुसार Avaya B2B AMC Support कामी Avaya कंपनीचे अधिकृत पुरवठाधारक यांचेकडून**

**संस्थानचे विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७७ तहकुब.**

**(कार्यवाही- ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

**विषय नं.८८ संस्थानचे नवीन शैक्षणिक संकुलामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.३७८ तहकुब.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.८९ शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विधवा महिला पाल्य मोफत शिक्षण योजना लाभार्थी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणेस व याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.९० श्री साईबाबा महाविद्यालयात (Ad-hoc) सहा.प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांचे मानधन वाढीबाबत.**

**निर्णय क्र.३८० तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.९१ श्री साईबाबा महाविद्यालयात संगणकशास्त्र प्रयोगशाळेसाठी तसेच इतर शाखांचे कार्यालयीन कामकाजासाठी संगणक खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८१ तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील मुख्य इमारती व कॅन्टीन इमारतीचे नुतनीकरण करणे कामाविषयी आर्किटेक्ट राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहून याकामी येणा-या रक्कम रु.२४.६९ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३८२** **आर्किटेक्ट श्री.राजेंद्र गट्टानी, अमरावती यांचे सादरीकरण पाहीले. प्रस्ताव तत्वत: मान्य. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून तांत्रिकदृष्टया मंजुरी घेण्यात यावी. त्यासाठी आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली. परवानगी मिळाल्यानंतर मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **मौजे निघोज येथील पालखी निवारा परिसरातील संस्थानला देणगी दाखल मिळालेल्या इमारतींकरीता संस्थानचे साई धर्मशाळा येथुन पाणी पुरवठा करणेसाठी डी.आय.पाईपलाईन टाकणेकरीता येणारे रु.३५.३५ लक्ष मात्रचे निव्वळ अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३८३** **तहकुब.** **(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **श्री साई प्रसादालय परिसरात सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी या बॅंकैचे ATM सुविधा सुरु करणेकामी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.३८४** **तहकुब.** **(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** **निराधार अनाथ विद्यार्थी व वृध्दांना आश्रय देणा-या एनजीओ संस्थांना संस्थानमार्फत आर्थिक अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.३८५** **तहकुब.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५** **श्री साईबाबा धर्मदाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर २०२३ ते मार्च २०२४ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४,२६,३३,७१७/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३८६ तहकुब.** **(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**वरील निर्णय क्र.२९१ ते ३८६ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ ९.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**(सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**